प्रलंबित तपशीलवार देयके व उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयात सादर करण्यासंदर्भात

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः मुंविनि-२०१७/प्र.क्र.३८/२०१७/विनियम
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १८ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) **वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः मुंविनि-१०१६/प्र.क्र.०६/१६/विनियम, दि.३.३.२०१६ व दि.४.३.२०१६**
२) **प्रधान सचिव (ले. व को.), वित्त विभाग यांचे समक्रमांकाचे दि.२९.९.२०१७ चे अर्धशासकीय पत्र.**

मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम १४९- परिशिष्ट-२२ नुसार सहायक अनुदाने मंजूर करण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तर वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मआख-१०.०६/प्र.क्र.४२/२००६/विनियम, दि.१२.२.२००८ व शासन निर्णय क्रमांक संक्षिप्त-२०१२/प्र.क्र.८/ २०१२/विनियम, दि.१४.३.२०१३ अनुसार आकस्मिक खर्चाच्या संक्षिप्त देयकावर काढण्यात आलेल्या रकमांची तपशीलवार देयके सादर करण्यासंदर्भात विहित कार्यपध्दती नमूद केली आहे.

२. मुंबई वित्तीय नियम-१९५९ च्या नियम-१४९ खालील परिशिष्ट-२२ नुसार सहायक अनुदान मंजूर करण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे. सहायक अनुदानाचे देयक मंजूर झाल्यापासून एक वर्षाच्या आत विहित नमुन्यात उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तर महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम-१९६५ च्या नियम-३४(ब) व महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम २८२ (२), ३०२ व ३०३ मधील तरतूदीनुसार संक्षिप्त देयकावर काढलेल्या रक्कमांची तपशीलवार देयके रक्कम काढल्यापासून “एक महिन्याच्या” आत लेखा परीक्षा अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे व अपवादात्मक परिस्थितीत नियंत्रक अधिकाऱ्याने, विभाग प्रमुखाची मान्यता घेऊन वाढीव कमाल ३ महिन्याच्या कालावधीत संक्षिप्त देयकाची तपशीलवार देयके सादर करणे आवश्यक आहे.

३. संदर्भिय क्र. १ येथील दि. ३.३.२०१६ व दि. ४.३.२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या विभागात तसेच अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयात प्रलंबित असलेली तपशीलवार देयके तसेच सहायक अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ महालेखापाल कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत तसेच संदर्भिय दि. २९.९.२०१७ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वयेही सर्व प्रशासकीय विभागांना यासंदर्भात सूचना देण्यात आलेली आहे.

४. संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके सादर न करण्याबाबत महालेखापालांनी शासनाच्या असे निदर्शनास आणलेले आहे की, विहीत मुदतीत तपशीलवार देयके सादर न केलेल्या अशा संक्षिप्त देयकांची संख्या फार मोठी असून ही एक अतिशय गंभीर बाब आहे. यामध्ये दिर्घकाळापासून प्रलंबित तपशीलवार देयकांचा समावेश आहे.

तपशीलवार देयके सादर न केल्यामुळे रकमेचा अपहार / अफरातफर संभवते. तसेच सहायक अनुदानाची प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे त्वरेने महालेखापाल कार्यालयास सादर करण्यानुषंगाने शासनाने त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे असे महालेखापाल यांनी कळविले आहे. महालेखापालांनी वेळोवेळी निदर्शनास आणलेल्या बाबींचा गांभीर्याने विचार करुन शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहे.

(अ) सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचे विभागातील प्रलंबित तपशीलवार देयके व उपयोगिता प्रमाणपत्रे याची माहिती महालेखापाल, मुंबई व नागपूर यांचे संकेतस्थळावरुन तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

(ब) दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत संक्षिप्त देयकावर आहरित केलेल्या रकमांची तपशीलवार देयके (गृह विभागाची शस्त्रे व दारुगोळा या बाबीव्यतिरिक्त) तसेच दि.३०.११.२०१६ पर्यंत मंजूर करण्यात आलेल्या सहायक अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रचलित नियमानुसार आहरण व संवितरण अधिका-यांनी महालेखापाल कार्यालयास तातडीने सादर करावीत.

(क) दिनांक २६.१२.२०१७ पूर्वी वर नमूद कालावधीपूर्वीची प्रलंबित संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे ज्या अधिकाऱ्यांनी सादर केली नाहीत, त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांकडे पाठविण्यात यावेत.

(ड) मंत्रालयीन विभागांनी या संबंधीची जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करुन तत्संबंधीची माहिती महालेखापाल व वित्त विभागाला प्रत्येक तिमाहीस कळवावी.

(इ) आहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या २०१७-१८ च्या गोपनीय अहवालात नियंत्रण अधिकारी यांनी तसेच नियंत्रक अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी या संबंधी केलेल्या प्रयत्नांबद्दल अभिप्राय लिहावेत व तत्पूर्वी या संबंधीची पूर्व कल्पना संबंधितांना देण्यात यावी.

(प) सदर शासन निर्णयाच्या दिनांकाच्या पूर्वीची विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता प्रलंबित असलेली तपशीलवार देयके/उपयोगिता प्रमाणपत्रे व त्यामध्ये अंतर्भूत एकूण रक्कम किती आहे याचा संपूर्ण तपशील प्रशासकीय विभागाने प्राप्त करुन घेऊन त्याचा निपटारा करण्याकरिता एक धडक कार्यक्रम हाती घ्यावा व त्याबाबतचा अनुपालन अहवाल ३० डिसेबर २०१७ पर्यंत महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई, महालेखापाल (लेखापरिक्षा)-१,मुंबई, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर, महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, नागपूर व प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मुंबई तसेच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे सादर करावा. प्रशासकीय विभागाने खुद्द विभाग तसेच क्षेत्रिय कार्यालय यांचा एकत्रित अहवाल सादर करावा.

(म) सहायक अनुदानाची प्रलंबित असलेली उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच तपशीलवार देयके सादर करण्यासाठी प्रलंबित असलेल्या सर्व संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके त्वरित सादर करावी. तद्नंतरही उपयोगिता प्रमाणपत्रे/तपशीलवार देयके सादर करण्यासाठी प्रलंबित असतील तर त्या विभागाची / कार्यालयाची, संबंधित लेखाशीर्षाखाली प्राप्त होणारी संक्षिप्त देयके (गृह विभागाची शस्त्रे व दारुगोळा बाबीची वगळून) /सहायक अनुदानाची देयके दि. **१ जानेवारी २०१८ नंतर** अधिदान व लेखा अधिकाऱ्यांनी / कोषागार अधिकाऱ्यांनी पारित करु नयेत.

(ज) या शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून अधिदान व लेखा अधिकाऱ्यांकडे / कोषागार अधिकाऱ्यांकडे संक्षिप्त आकस्मिक खर्चाची देयके पारित/सहायक अनुदान रकमेची देयके पारित करण्यासाठी प्राप्त झाल्यास प्रत्येक वेळी संबंधित लेखाशीर्षाखाली यापूर्वीची संक्षिप्त आकस्मिक खर्चाची देयके/सहायक अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित नसल्याचे संबंधित विभागाच्या / कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. (यापूर्वीच्या संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके/उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित असल्यास त्यांची यादी अधिदान व लेखा अधिकारी, कोषागार अधिकारी / उपकोषागार अधिकारी यांना पुरविण्यात यावी.)

(ट) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ मधील बाबींकरिता संक्षिप्त देयकांन्वये रक्कम काढता येते. तसेच वित्त विभागाने खास बाब म्हणून सहायक अनुदानाची रक्कम मंजूर करण्यास मंजूरी दिली असल्यास अथवा संक्षिप्त देयकांवर रक्कम काढण्यास परवानगी दिली असल्याशिवाय अन्य कोणत्याही बाबींकरिता संक्षिप्त देयकांवर रक्कम काढण्यास कोषागार अधिकाऱ्यांनी मंजूरी देऊ नये.

(ल) कोषागारातून आवश्यक नसेल तेव्हा रकमा काढण्याच्या प्रवृत्तीस पायबंद घालावा आणि काढलेल्या रकमा कोणत्याही परिस्थितीत अनुपयोजित (unutilised) ठेऊ नयेत. अशा प्रकारची एखादी घटना शासनास कळविली गेली तर त्याची गंभीर दखल घेतली जाईल. आवश्यकतेनुसारच संक्षिप्त देयकावर रकमा काढण्यात याव्यात आणि संक्षिप्त देयकावर रकमा काढल्यानंतर त्याबाबतची तपशीलवार देयके कोषागारांना वेळीच सादर करण्यात यावीत व ज्या ज्या विभागाकडे अशी जुनी थकित देयके असतील ती सर्व निकालात काढण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी त्वरित कारवाई करावी. कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित उपयोगिता प्रमाणके/जुनी तपशीलवार देयके सादर करण्याच्या अडचणी सांगून ती सादर न करण्याची सूट मागण्यात येऊ नये. तसेच अशा प्रकरणाची चौकशी करुन, अशा दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर उचित कारवाई करावी.

(स) प्रलंबित असलेली उपयोगिता प्रमाणके व निकालात न निघालेली आकस्मिक खर्चाची तपशीलवार देयके आणि संक्षिप्त देयकांबाबतची स्थिती असमाधानकारक असल्याचे वारंवार निदर्शनास येत असल्याने व ती विनाविलंब सुधारणे जरुर असल्यामुळे दिनांक २६ डिसेंबर,२०१७ पर्यंत सर्व प्रलंबित तपशीलवार आकस्मिक खर्चाची देयके निकालात काढली जातील त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणके सादर करण्यात येतील याची सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी, विभाग प्रमुखांनी आणि मंत्रालयातील प्रशासनिक विभागांनी खात्री करुन घ्यावी व प्रलंबितता कमी करण्याच्या दृष्टीने परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि प्रलंबितता निकालात काढण्यासाठी आवश्यक ते उपाय योजावेत. आकस्मिक खर्चाची तपशीलवार देयके सादर करण्यासाठी तसेच सहायक अनुदानांची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यास्तव सध्या विहित केलेली मुदत पुरेशी आहे. त्यामुळे **संबंधित लेखाशीर्षाखाली पूर्वीची (वरील "ब" प्रमाणे) उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली नसतील अथवा संक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके निकाली निघालेली नसतील तर कोणतेही सहायक अनुदानाचे देयक, संक्षिप्त देयक पारीत करण्याचे कोषागार अधिकारी नाकारु शकतात. यास्तव त्यामुळे कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे शासनाचे व्यवहार थंडावले तर त्या अधिकाऱ्यांना त्यासाठी व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येतील.**

वरील सूचनांची काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१८१७०६४४३००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2017.12.18 17:11:20 +05'30'

(अ.श्री दिघे.)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. * प्रधान महालेखापाल (लेखा व परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग
१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई मधील सर्व अधिकारी/कर्यासने
११. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
१२. राज्य निवडणूक आयोग
१३. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१७. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१८. * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१९. * प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
२०. * प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
२१. * प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२२. * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२३. * प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई
२४. * प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१
२५. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.